रासनिप्रा

# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
# महाराष्ट्र राज्य, पुणे

जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे –४११००१.
फोन नं. - (०२०) २६०५०६४१
मेल आयडी - sceapune@gmail.com वेब साईट - scea.maharashtra.gov.in

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/कृउबास/समिती सदस्य नावे/आदेश/९६५६/२०२२
दिनांक :- २९/१२/२०२२

**वाचले :-** १. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुद

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) अधिनियम २०२० दिनांक १४.०३.२०२०

३.महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) (पहिली सुधारणा) नियम २०२०, दिनांक १६.०४.२०२१

४.या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र.रासनिप्रा/कृउबास/जि.नि.अ./घोषित करणे/१४५३/२०२१ दिनांक २९.०४.२०२१

५. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/कृउबास/समिती सदस्य नावे/आदेश /१६०९/२०२० दिनांक १०.०६.२०२०

**प्रस्तावना :-**

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुदीनुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्याच्या निवडणूकांचे अधिक्षण, निर्देशन व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपवलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचावे क्र.४ चे आदेशानुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका घेण्याकरीता संबंधित जिल्हयातील जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) म्हणून घोषित केलेले आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ (४) (क) मधील तरतुदीनुसार, कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूकीचे सर्व निकाल उपलब्ध झाल्यावर, शक्य तितक्या लवकर समितीच्या निवडून आलेल्या एका किंवा अनेक सदस्यांची नावे राजपत्रात तसेच त्या बाजारक्षेत्रात खप असलेल्या मराठी वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ (४) (ख) मधील तरतुदीनुसार, एखाद्या सार्वत्रिक निवडणूकीत, कलम १३ चे पोटकलम (१) किंवा (१क) अन्वये निवडावयाच्या कोणाही व्यक्तीची नावे कोणत्याही कारणामुळे कलम १४ (४) (क) नुसार प्रसिद्ध होऊ शकत नसतील तर आणि निवडणूकीच्या उपलब्ध निकालानुसार समिती बारापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांची



Scanned with CamScanner

मिळून बनलेली असेल, तर त्याबाबतीत अशा सदस्यांची नावे कलम १४ (४) (क) नुसार राजपत्रात तसेच एखाद्या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ (४) (घ) मधील तरतुदीनुसार प्रत्येक सार्वत्रिक निवडणूकीनंतर समितीच्या सर्व सदस्यांची नावे खंड (क) अन्वये प्रसिद्ध करण्यात आल्यावर किंवा यथास्थिती ज्यायोगे कलम १४(४) (ख) प्रमाणे समिती बारापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांची मिळून तयार होईल अशी नावे या पोट कलमान्वये वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आल्यावर बाजार समितीची रितसर रचना झाली असल्याचे मानण्यात येणार आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ६५ मधील तरतुदीनुसार निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून निकाल मिळाल्यानंतर राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या आदेशास अधिन राहून समितीच्या सर्व निर्वाचित सदस्यांची नावे त्यांच्या कायम पत्ते व मतदार संघनिहाय प्रसिद्ध करण्याची कार्यवाही जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांना करावयाची आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार) मधील तरतुदीनुसार कृषि उत्पन्न बाजार समितींच्या निवडणूका सुरळीतपणे व भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियमांच्या व नियमांच्या तरतुदींशी सुसंगत आदेश पारीत करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत.

ज्या अर्थी, प्राधिकरण कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर सर्व अथवा बारा समिती सदस्यांची नावे प्रसिद्ध करणेसंदर्भात खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-:: आदेश ::-**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ (अ) (१) (अ), कलम १४ (४) (क) व कलम १४ (४) (ख) व महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून प्राधिकरण वाचावे क्र.५ चे आदेश रद्द करुन, कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर समिती सदस्यांची नावे प्रसिद्ध करण्याकरीता खालील अनुसूचीतील स्तंभ क्रमांक २ मधील जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांची स्तंभ क्रमांक ३ मधील कार्यक्षेत्राकरीता नियुक्ती करीत आहे.

**अनुसूची**

| अ.क्र. | जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांचे पदनाम | कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा ठाणे | ठाणे जिल्हा |
| २ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा पालघर | पालघर जिल्हा |
| ३ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा रायगड | रायगड जिल्हा |
| ४ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा रत्नागिरी | रत्नागिरी जिल्हा |



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| ५ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा सिंधुदुर्ग | सिंधुदुर्ग जिल्हा |
| ६ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा नाशिक | नाशिक जिल्हा |
| ७ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा धुळे | धुळे जिल्हा |
| ८ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा नंदुरबार | नंदुरबार जिल्हा |
| ९ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा जळगांव | जळगांव जिल्हा |
| १० | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा अहमदनगर | अहमदनगर जिल्हा |
| ११ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा पुणे | पुणे जिल्हा |
| १२ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा सोलापूर | सोलापूर जिल्हा |
| १३ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा सातारा | सातारा जिल्हा |
| १४ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा सांगली | सांगली जिल्हा |
| १५ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा कोल्हापूर | कोल्हापूर जिल्हा |
| १६ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा औरंगाबाद | औरंगाबाद जिल्हा |
| १७ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा जालना | जालना जिल्हा |
| १८ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा परभणी | परभणी जिल्हा |
| १९ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा हिंगोली | हिंगोली जिल्हा |
| २० | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा बीड | बीड जिल्हा |
| [illegible] | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा नांदेड | नांदेड जिल्हा |
| २[illegible] | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा उस्मानाबाद | उस्मानाबाद जिल्हा |
| २३ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा लातूर | लातूर जिल्हा |
| २[illegible] | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा बुलढाणा | बुलढाणा जिल्हा |
| २५ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा अकोला | अकोला जिल्हा |
| २६ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा वाशिम | वाशिम जिल्हा |
| २७ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा अमरावती | अमरावती जिल्हा |
| २८ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा यवतमाळ | यवतमाळ जिल्हा |
| २९ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा वर्धा | वर्धा जिल्हा |
| ३० | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा नागपूर | नागपूर जिल्हा |
| ३१ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा भंडारा | भंडारा जिल्हा |
| ३२ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा गोंदिया | गोंदिया जिल्हा |
| ३३ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा चंद्रपूर | चंद्रपूर जिल्हा |
| ३४ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा गडचिरोली | गडचिरोली जिल्हा |

१. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक निकाल जाहीर केल्यापासून ७ दिवसांत निवडणूक निकालाची प्रत संबंधित जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांचेकडे सादर करावी.

२. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) हे स्वत: निवडणूक निर्णय अधिकारी असल्यास जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी निकालाची प्रत निकाल जाहीर झाल्यापासून ७ दिवसांत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास सादर करावी.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

३. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी निकाल प्राप्तीपासून १५ दिवसांत समिती सदस्यांची नावे, त्यांचे पत्ते व मतदारसंघ निहाय राजपत्रात तसेच स्वतंत्र मराठी वृत्तपत्रात प्रसिद्ध करावी.

४. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी समिती सदस्यांची नावे त्यांच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर, संबंधित बाजार समितीच्या सूचना फलकावर आणि तिच्या अभिलेखासाठी त्या समितीच्या नोंदणीकृत पत्यावर समितीस सादर करावी.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने.**

(डॉ.पी.एल.खंडागळे)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति :-

१. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)

प्रत माहितीस्तव :-

१. मा.पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. संबंधित कृषि उत्पन्न बाजार समिती.



Scanned with CamScanner